Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: १० डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

मानवी हक्क दिन आज पाळण्यात येत आहे. तत्कालिन संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याच्या घटनेनिमित्त दरवर्षी हा दिवस पाळला जातो. 'आपले हक्क, आपलं भविष्य', ही यंदाच्या मानवी हक्क दिनाची संकल्पना आहे. यानिमित्त राष्ट्रीय मानवी हक्क आयोगानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संबोधित करणार आहेत.

****

माजी परराष्ट्रमंत्री आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री एस एम कृष्णा यांचं आज पहाटे बंगळुरु इथं प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं, ते ९२ वर्षांचे होते. एस एम कृष्णा हे कर्नाटकचे दहावे मुख्यमंत्री होते. २००९ ते २०१२ या काळात ते परराष्ट्र मंत्री होते, तर २००४ ते २००८ या काळात महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काम पाहिलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामैय्या यांच्यासह इतर नेत्यांनी एस एम कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

बहुउद्देशीय क्षेपणास्त्रवाहू जहाज आय एन एस तुशील चा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत काल भारतीय नौदलात समावेश करण्यात आला. रशियाच्या यंतार बंदरात झालेल्या या समारंभात भारतीय नौदलप्रमुख ऍडमिरल दिनेश त्रिपाठी उपस्थित होते. आय एन एस तुशील, ब्राम्होससह अनेक अत्याधुनिक क्षेपणास्त्रांनी सज्ज असून, अतिदूरच्या सागरात जगभरात कुठेही कार्यरत राहू शकतं.

****

महाराष्ट्र हे असिमित ताकदीचं राज्य आहे, आता आपण क्रमांक एक वर आहोत, म्हणून थांबू नका, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सचिवस्तरीय

अधिकाऱ्यांना सांगितलं. त्यांनी काल विधान भवनातल्या समिती सभागृहात या अधिकाऱ्यांची विशेष आढावा बैठक घेतली. केंद्र सरकारच्या सहकार्याचा राज्याच्या प्रगतीसाठी पुरेपूर वापर करून घेण्यासाठी अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा, असं ते म्हणाले. पायाभूत सुविधांप्रमाणेच राज्यातल्या, केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजनांसाठीही स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे त्यांनी निर्देश दिले. त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत लाभ गतीनं पोहोचवण्यासाठी जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगानं हाती घ्यावेत, आपले सरकार पोर्टल पूर्ण क्षमतेनं चालवावं, जिल्ह्यांच्या पालक सचिवांनी आपापल्या जिल्ह्यांचे तातडीनं दौरे सुरु करावेत, राज्य शासनाची सर्व संकेतस्थळं आरटीआय फ्रेंडली करावी, आदी निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

****

मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बसने अनेक वाहनांना धडक देऊन झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार झाले असून, किमान वीस जण जखमी झाले आहेत. आंबेडकर नगर परिसरात रात्रीच्या सुमारास हा अपघात झाला. जखमींना सायन रुग्णालय आणि भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने करण्यासाठी आदेश देण्यात आले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं आहे.

****

६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत सांगली केंद्रातून लोकरंगभूमी सांगली या संस्थेच्या ‘सितरोंसे आगे’ या नाटकाला प्रथम पारितोषिक तसंच सांगली शिक्षण संस्थेच्या ‘घाट’ या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झालं आहे. सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही घोषणा केली असून, या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेच्या रत्नागिरी केंद्रावर झालेल्या प्राथमिक फेरीत कोतवडे पंचक्रोशी माजी विद्यार्थी संघाने सादर केलेल्या `कढीपत्ता` या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झालं असून, या नाटकाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ काल उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

मागील वर्षी बुलढाणा जिल्ह्यातून ५५ लाख ९० हजार रुपये निधी संकलित करण्यात आला होता.

****

रेल्वेच्या हैदराबाद विभागातल्या रोलिंग ब्लॉक मुळे काही रेल्वे गाड्या अंशत: रद्द करण्यात आल्या आहेत. आजपासून ते १६ तारखेपर्यंत मनमाड – धर्माबाद मराठवाडा एक्स्प्रेस नांदेड ते धर्माबाद दरम्यान, तर दौंड – निझामाबाद डेमू गाडी मुदखेड ते निझामाबाद दरम्यान अंशत: रद्द करण्यात आली आहे.

****

ओमानमध्ये सुरु असलेल्या महिलांच्या आशिया चषक कनिष्ठ गट हॉकी स्पर्धेत दुसर्या साखळी सामन्यात भारताने मलेशियाचा पाच – शून्य असा पराभव केला. भारताचा पुढचा सामना चीन बरोबर होणार आहे.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ – बीसीसीआयचे कार्यकारी सचिव म्हणून देवजित सैकिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी त्यांची नेमणूक केली.

मुंबईसह राज्यात पुन्हा थंडी सुरु झाली आहे. गेल्या ९ वर्षांतल्या सर्वात कमी तापमानाची मुंबईत नोंद झाली. दरम्यान उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे मुंबईसह नाशिक, आणि पुण्यात थंडीचा जोर वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****